# ज्योतीत प्रगटली दिव्य स्वामीरुपे........

तबकात चांदीच्या निरांजनी ज्योत तेवते अति शांत
रूप सद्‌गुरु रायांचे तेज प्रतिबिंबित कोटिसूर्य त्यात
ज्योतीत प्रगटली तव दिव्य अनुपम रुपे स्वामीराया
मंत्रमुग्ध मी, दिड़मूढ मी, स्तिमित आश्चर्य हृदया
ज्योतीर्मय रूपांत चमकले तेजकिरण असीम ज्ञानाचे
प्रगटले शक्ती तेज पवित्र निस्सीम वैराग्याचे
कधी चमक नवकिरण अद्भुत चैतन्याची
कधी भासते प्रेममय दृष्टी स्नेहामृताची
बघता बघता ज्वलंत अग्नीबाण उडाले प्रखर क्रोधाचे
भस्म होऊ लागले संचित पर्वत अनंत जन्म पापांचे
ज्योतीत चाल स्वामींची वेग अति सत्वरे
ब्रह्मांडे फिरता गरगर कंपित झाली सर्व भूवरे
कधी बरसात चमचम चांदण्या अन् ज्योतीफुलांची
आनंद हर्ष कारंजी उडती तव तरल प्रेमकृपेची
वाहत आले प्रकाश झरे शुध्द आनंदाचे
शीतल चंद्र नील नभी, घनगंभीर रुप सागराचे
भक्ती प्रेम शुध्द ज्योतीत रूप तुझे मधुर शांत मोहक
भरभरुनी पाहता नेत्र तृप्त, मन झाले सात्विक
ज्योतीत प्रगटता तव दिव्य रुपे मधुर स्वामीराया
मोहरले मन माझे, अंतर्यामी असीम शांती गुरुराया.......।।

**हेमा जोशी**